# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या पुरवणी परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबर ऐवजी जुलै-ऑगस्ट मध्ये आयोजित करण्याबाबत...

## प्र क ट न

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये याकरिता सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार अंतर्गत प्रविष्ठ होणारे, तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणारे विद्यार्थी यांची पुरवणी परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबर ऐवजी जुलै-ऑगस्ट मध्ये घेण्यात येणार आहे. यापुढे सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये परीक्षा घेण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(कृष्णकुमार पाटील)
दि.२२/०४/२०१६ सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

क्रमांक पुविमं/डीपी/मार्च-१६-155
पुणे ४११००५
दि.२४/०४/२०१६

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
१० वी/१२वी सर्व मान्यताप्राप्त,
शाळा /कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळाच्या प्रकटनाची नोंद घेवून,संबंधित विदयार्थी,पालक,शिक्षक इ.सर्व संबंधित घटकांपर्यंत माहिती निर्देशनास आणून देण्यात येवून, विदयार्थी या परीक्षेपासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५.